सं.फौ.ख.क्र.५१६/२०१३
किसनवीर कारखाना विरुध्द संदीप
नि.क्र.४६ खाली

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ हयांची सरतपासणी शपथेवर सुरु.**
**फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. आर.एच. भोसले –**

फिर्यादी कारखान्याने मला दिलेल्या अधिकारपत्राचा दि. २८.१२.२०२० रोजीच्या सभेतील ठरावाची मुळ प्रत आता मला दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर कार्यकारी संचालक एन.एन. काळोखे हयांची सही आहे. मी ती ओळखतो कारण ते माझे वरिष्ठ अधिकारी आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. तो **नि.क्र.५१** वर आहे. आता मला दि. १२.०६.२०१३ रोजीचा स्टेट बँक ऑफ हैदराबाद शाखा आष्टी चा मुळ धनादेश क्र.९९०३४२ दाखविण्यात आला. तो रक्कम रु. १,२९,६३६/- चा आहे. त्यावर आरोपीची सही आहे. मी ती ओळखतो. कारण तशीच सही त्याने करारनाम्यावर देखील केलेली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. तो **नि.क्र.५२** वर आहे. सदरील धनादेश अनादरीत झाल्याबद्दलचा चेक रीटर्न मेमो मला आता दाखविण्यात आला. त्यावर संबंधीत बँकेचा शिक्का व अधकिा-याची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. तो **नि.क्र.५३** वर आहे. त्या मेमोसह सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक यांनी दिलेल्या पत्राची मुळ प्रत मला दाखविण्यात आली. त्यावर संबंधीत बँकेचा शिक्का व अधिका-याची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. तो **नि.क्र.५४** वर आहे. आता मला आरोपीने फिर्यादी कारखान्यासोबत दिलेला मुळ उस तोडणी व वाहतुक करारनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर फिर्यादी कारखान्याचे कार्यकारी संचालक लक्ष्मण भाउसाहेबत शेळके यांची सही आहे. तसेच त्यावर शेती अधिकारी यांची सही आहे. त्याचप्रमाणे त्यावर करारनामा लिहुन देणार म्हणून आरोपीची स्वाक्षरी आहे. ती मी ओळखतो कारण ती सही आरोपीने माझ्यासमक्ष केलेली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. तो **नि.क्र.५५** वर आहे. या करारनाम्याच्या आधारे वाहन करारनामा देखील करण्यात आला होता. तो मला आता दाखविण्यात आला. तो मुळ असुन त्यावर आरोपीची तोंडी मुकादम म्हणून सही आहे. ती सही मी ओळखतो कारण ती त्याने माझ्यासमक्ष केलेली आहे. त्यतािल मजकुर बरोबर आहे. तो करारनामा **नि.क्र.५६** वर आहे. आरोपीने सदरील करानाम्यासोबत संमतीपत्र लिहुन दिले होते. आता मला ते दाखविले. त्यावर आरोपीने माझ्यासमक्ष सही केली होती. मी ती ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. ते संमतीपत्र **नि.क्र.५७** वर आहे.

२. धनादेश अनादरीत झाल्याबद्दल आरोपीस फिर्यादी कारखान्यातर्फे कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली होती. आता मला ती स्थळप्रत दाखविण्यात आली. त्यावर फिर्यादी कारखान्याचे विधिज्ञ श्री एन.एस.गायकवाड यांची सही आहे. मी ती ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. ती स्थळप्रत **नि.क्र.५८** वर आहे. त्या बाबतची पोच पावती **नि.क्र.५९** वर आहे. त्यावर आरोपीची सही व पोस्टाचा शिक्का आहे.

सरतपास पूर्ण

**<u>उलटत्पास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री एम.एस.बागवान</u>**

प्रकरण उलटतपासाकरीता तहकुब.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

दि.२७.०९.२०२३.

स्वाक्षरी/-

(आर.एम. भेंडे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्यायालय क्र.२,वाई.